RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक ९७] सोमवार, ऑगस्ट १, २०१६/श्रावण १०, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २०३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑगष्ट २०१६.

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक संकीर्ण. ११/२०१४/प्र.क्र.७८/अ-२.—भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम १०९ ची पोट-कलमे (१) आणि (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क नियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ११२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :–

१. या नियमांस, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (दुसरी सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ याच्या नियम १४ मधील उप-नियम, (१) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) याच्या तरतुदीअन्वये विकास योजनेतील राखीव क्षेत्रांच्या संपादनाबाबत तसेच पन्नास टक्के किंवा त्याहून अधिक अपूर्ण सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत, भूमिसंपादनाच्या खर्चासंबंधीची तीस टक्के इतकी बिनव्याजी रक्कम अधिनियमाच्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयात, हे घोषणापत्र प्रसिद्ध होण्यापूर्वी जमा करण्यात येईल आणि भूमिसंपादनाच्या खर्चासंबंधिची उर्वरित सत्तर टक्के रक्कम निवाडा प्रसिद्ध करण्यापूर्वी जमा करण्यात येईल. आणि जर अशी रक्कम जमा केलेली नसेल, तर अधिनियमाच्या अनुक्रमे कलम १९ किंवा २३ अन्वये कोणतीही घोषणा करता येणार नाही किंवा निवाडा देता येणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु.कि.गावडे,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya the Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, date 1st August 2016

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No.Misc.11/2014/C.R.78/A-2.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 109 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, the same having been previously published as required by section 112 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) (Second Amendment) Rules, 2016.

2. In rule 14 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014, to sub-rule (1), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, in cases of acquisition of the reserved places in development plan under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) as well as in cases of acquisition for fifty percent or more for incomplete irrigation projects, thirty percent of amount towards the cost of acquisition of land shall be deposited, without interest, in the Collector Office before the publication of the declaration under section 19 of the Act and the remaining seventy percent amount towards the cost of acquisition of the land shall be deposited before the publication of the award; and no declaration or award shall be made under section 19 or 23 of the Act, respectively, if such amount is not deposited."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Deputy Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.